# Prabhat Kids School, Akola 2025-26

(CBSE Affiliation No. 1130426)

Std.VII Section : ____________ Subject : Marathi Marks : 80

Date : ______________ Term - I

Name :__________________________________________ Roll No. ____________ Time : 3 Hrs.

## विभाग अ उतारा आकलन

**प्रश्न १ अ) खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही ५) गुण ५**

महाराष्ट्राच्या इतिहासात किल्ल्यांचे महत्त्व मोठे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असलेला किल्ला म्हणजे रायगड तो भव्य आहे. रायगड जिल्ह्यातील महाडजवळ असलेला हा किल्ला शिवाजी महाराजांनी १६५६ मध्ये जिंकला. त्यावेळी तो रायरी या नावाने ओळखला जायचा. याच किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. किल्ल्यावर बाजारपेठ, महादरवाजा आणि नगारखाना आहे. किल्ल्यावरील गंगासागर तलाव, टकमक टोक व हिरकणीचा बुरुज या जगात प्रसिद्ध आहेत. शिवाजी महाराजांची समाधी आणि त्यांचे स्मारक तेथे आहे.

रायगड समुद्रसपाटीपासून ४४०० फूट उंचीवर आहे. रायगडावर प्रचंड जंगल आहे. तेथील हवा उत्तम आहे आणि परिसर रमणीय आहे. आता 'रोप वे' ची सोय झाल्यामुळे लहान मुले, वृद्धांनाही तेथे जाणे सोपे झाले आहे. पावसाळ्यात मात्र प्रचंड पावसामुळे तेथे जाणे अशक्य असते. प्रत्येकाने एकदा तरी रायगड किल्ल्याला जरुर भेट दिली पाहिजे.

१) रायगड समुद्रसपाटीपासून किती फूट उंचीवर आहे?

अ) ४४०० ब) ५५०० क) ६६०० ड) ७७००

२) शिवाजी महाराजांची राजधानी कोणती होती?

अ) रायगड ब) प्रतापगड क) कोंढाणा ड) जंजिरा

३) रायगड किल्ला आधी कोणत्या नावाने ओळखला जायचा?

अ) राजगड ब) प्रतापगड क) रायरी ड) पायरी

४) महाराष्ट्राच्या इतिहासात कशाचे महत्व मोठे आहे?

अ) घरांचे ब) विहीरीचे क) किल्ल्यांचे ड) समुद्राचे

५) रायगड किल्ल्यावरील परिसर कसा आहे?

अ) भकास ब) रमणीय क) सुनसान ड) गोंगाट

६) मोठे या शब्दासाठी उताऱ्यात आलेला समानार्थी शब्द ओळखा.

अ) ठेंगणे ब) भव्य क) लहान ड) छोटे

**प्रश्न १ आ) पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) गुण ३**

१) रायगड किल्ला शिवाजी महाराजांनी कधी जिंकला?

२) लहान मुले व वृद्धांना आज रायगडावर जाणे कशामुळे सोपे झाले आहे?

३) किल्ल्यावर असलेल्या बुरुजाचे नाव काय?

Sample Paper Prabhat Kids School, Akola

४) रायगडावर हवा कशी आहे?

**प्रश्न २ अ) खालील कविता वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही ४)**

**गुण ४**

माझं गाव
थोडसं लहान आहे
पण शेवटी माझं गाव आहे
पहाटे कोंबड्याने दिलेली बाग
त्यातूनच माणसांची असणारी कुजबुज
उठल्यापासून कामाचे नियोजन
यांनीच बहरलेलं आहे
पण शेवटी तेच माझं गाव आहे

सैराट फिरणं असुदे
त्यामध्ये विहिरीमध्ये पोहणं असुदे
वा गुरामागे चारत बसणं असुदे
यातच खरा आनंद आहे
म्हणूनच ते शेवटी माझं गाव आहे

शेजाऱ्यांची देवाणघेवाण
बोलण्यामध्ये असणारी आपुलकी
वरतून माणसांचा साधेपणा
याच सौंदर्यानं नटलेलं आहे
शेवटी तेच न माझं गाव आहे

दररोज पहाटेचा काकडा
सायंकाळचा हरिपाठ
आणि नंतर रामायण कथेचं वाचन
असच परंपरा जपणारं आहे
म्हणूनच शेवटी तेच माझं गाव आहे

- महेश शिंदगे

Sample Paper
Prabhat Kids School,
Akola

१) पहाटे बांग कोणी दिली आहे?

अ) कोंबड्याने  ब) पोपटाने  क) कबुतराने  ड) मोराने

२) कवीचं गाव कसं आहे?

अ) मोठं  ब) थोडसं लहान  क) मध्यम  ड) उंच

३) गावातील माणसं कशी आहेत?

अ) रागीट  ब) साधी  क) अहंकारी  ड) भित्री

४) गावात कुठल्या कथेचे वाचन होते?

अ) रामायण ब) महाभारत क) भगवत गीता ड) बायबल

५) उठल्यापासून कशाचे नियोजन असते?

अ) आरामाचे ब) कामाचे क) खेळाचे ड) वाचनाचे

**प्रश्न २ आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ३) गुण ३**

१) वरील कवितेचे कवी कोण आहेत?

२) कवितेत कुजबूज कोणाची आहे?

३) गावच्या लोकांच्या बोलण्यात काय आहे?

४) कवीचे फिरणे कसे आहे?

५) गावात दररोज पहाटे व सायंकाळी काय असते?

## विभाग ब व्याकरण

Sample Paper Prabhat Kids School, Akola

**प्रश्न ३ अ) सूचनेनुसार सोडवा. (कोणतेही ३) गुण ३**

१) इसाबने सर्वत्र आश्चर्याने पाहिले. ( नाम ओळखा )

अ) इसाबने ब) पाहिले क) सर्वत्र ड) आश्चर्याने

२) खालील पैकी कोणते नाम नाही?

अ) झाड ब) श्याम क) राधा ड) हसरा

३) अभय हुशार **<u>मुलगा</u>** आहे. (अधोरेखित शब्दाचा नामाचा प्रकार ओळखा)

अ) विशेष नाम ब) भाववाचक नाम क) सामान्य नाम ड) सर्वनाम

४) खालीलपैकी भाववाचक नाम ओळखा.

अ) विजय ब) सीता क) पर्वत ड) नम्रता

**प्रश्न ३ आ) सूचनेनुसार सोडवा. (कोणतेही ३) गुण ३**

१) ते काम करत नाहीत. (सर्वनाम ओळखा )

अ) नाहीत ब) ते क) काम ड) करत

२) सर्वनामाचे एकूण प्रकार किती?

अ) तीन ब) चार क) पाच ड) सहा

३) .......... दोघं किती एकसारखे दिसतात. (रिकाम्या जागी योग्य सर्वनामाचा वापर करा.)

अ) तो ब) तुम्ही क) हा ड) कोण

४) मी **<u>स्वतः</u>** त्याला पाहिले. ( अधोरेखित शब्दाचा सर्वनामाचा प्रकार ओळखा.)

अ) पुरूषवाचक सर्वनाम ब) प्रश्नार्थी सर्वनाम \

क) संबंधी सर्वनाम ड) आत्मवाचक सर्वनाम

**प्रश्न ३ इ) सूचनेनुसार सोडवा. (कोणतेही ३) गुण ३**

१) सुमनच्या घराजवळ एक बाग आहे. (विशेषण ओळखा)

अ) बाग　　ब) आहे　　क) एक　　ड) घराजवळ

२) खालील पैकी योग्य विशेषण ओळखा.

अ) जातो　　ब) पटकन　　क) गोड　　ड) गोपाळ

३) खालीलपैकी सार्वनामिक विशेषण ओळखा.

अ) माझे　　ब) हुशार　　क) दोन　　ड) चार

४) ज्या विशेषणामुळे नामाची संख्या दाखवली जाते त्यास कोणते विशेषण म्हणतात?

अ) गुणवाचक विशेषण　　ब) संख्यावाचक विशेषण

क) सार्वनामिक विशेषण　　ड) सर्वनाम

**प्रश्न ३ ई) सूचनेनुसार सोडवा. (कोणतेही ३)　　गुण ३**

१) वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दाला काय म्हणतात?

अ) क्रियापद　　ब) नाम　　क) विशेषण　　ड) सर्वनाम

२) खालील पैकी क्रियापद नसलेला शब्द ओळखा.

अ) जातो　　ब) मधूर　　क) होता　　ड) गाते

३) न बोलता ती उभी राहली. (क्रियापद ओळखा)

अ) न　　ब) ती　　क) राहली　　ड) बोलता

४) मी सांगितलेली हकीकत ऐकून आईला गहिवर........　　(योग्य क्रियापदाची निवड करा.)

अ) झाला　　ब) आला　　क) होता　　ड) झाले

**प्रश्न ४ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द ओळखा. (कोणतेही २)　　गुण २**

१) भाऊ -　अ) आई　　ब) बंधू　　क) मावशी　　ड) आत्या

२) माती -　अ) मृदा　　ब) वारा　　क) पाणी　　ड) आकाश

३) निश्चय -　अ) कथा　　ब) निर्धार　　क) स्तुती　　ड) निराश

**प्रश्न ४ आ) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द ओळखा. (कोणतेही २)　　गुण २**

१) आवड ×　अ) रस　　ब) नावड　　क) छंद　　ड) गोडी

२) यश ×　अ) विजय　　ब) यशस्वी　　क) अपयश　　ड) अजय

३) सुगंध ×　अ) दुर्गंध　　ब) सुवास　　क) गंध　　ड) आवड

**प्रश्न ४ इ) सूचनेनुसार सोडवा. (कोणतेही २)　　गुण २**

१) कार्यक्रमाला **<u>आजी</u>** आली होती. (अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.)

२) ही जागा **<u>पुरुषां</u>**साठी आहे. (अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.)

३) झाडावर **<u>चिमणा</u>** बसलेला होता. (अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.)

**प्रश्न ४ ई) सूचनेनुसार सोडवा. (कोणतेही २)　　गुण २**

Sample Paper Prabhat Kids School, Akola

१) श्यामने **<u>बादली</u>** आणली होती. (अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.)

२) आजारी पडल्यानंतर **<u>औषध</u>** घ्यावे. (अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.)

३) प्रविण उत्तम **<u>भाषण</u>** देतो. (अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.)

### विभाग क पाठ्यपुस्तक

**प्रश्न ५ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ४)** **गुण ४**

१) श्यामचे वडील वरचेवर दापोलीला कशासाठी जात?

२) नवीन पाऊस सुरू होण्याचा मातीवर काय परिणाम होतो?

३) कर्णागड कुठे वसलेला आहे?

४) सोनालीने काय करावे असे आईला वाटत होते?

५) सोनालीला प्रोत्साहन देण्यासाठी तिच्या बाबांनी काय केले?

**प्रश्न ५ आ) योग्य पर्याय ओळखून रिकाम्या जागा भरा. (कोणतेही ४)** **गुण ४**

१) मे महिन्याची सुट्टी संपवून मी परत.......... शिकावयास गेलो

(नाशीकला, लातुरला, दापोलीस, मुंबईस)

२) गडाच्या पायथ्याशी.......... नदी बारमाही झुळझुळत असते. (गंगा, यमुना, मंदाकिनी, गोदावरी)

३) हिवाळ्यात हा प्रदेश......... वाटतो. (सोन्याचा, पाचूचा, चांदीचा, तांब्याचा)

४)........ पक्षी हा शेतकऱ्यांचा मित्र आहे. (माळढोक, कबुतर, मोर, कावळा)

५) आजकालच्या मुलांना........ म्हणजे कंटाळवाणी गोष्ट वाटते.

(खेळणे, नाचणे, वाचन, चित्र काढणे)

**प्रश्न ५ इ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही १)** **गुण ३**

१) श्यामचे डोळे अश्रूंनी का न्हाले होते?

२) गोपाळचा कोणता गुण तुम्हाला आवडला? का ते लिहा.

३) आईने सोनालीला कथेचा सारांश लिहायला का सांगितला?

**प्रश्न ५ ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा खालील वाक्यातील योग्य त्या ठिकाणी वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **गुण ५**

(आनंद गगनात न मावणे, सफल होणे, नवल वाटणे, हतबल होणे, दुथडी भरून वाहणे)

१) मी चित्रकलेच्या परीक्षेत यशस्वी झालो. २) वाटेत साप दिसल्यामुळे मला आश्चर्य वाटले.

३) मी पास झाल्यामुळे मला खूप आनंद झाला. ४) परीक्षेत नापास झाल्यामुळे तो निराश झाला.

५) पावसाळ्यात मोरणा नदी पूर्ण भरून वाहते.

**प्रश्न ६ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ४)** **गुण ४**

१) कवीच्या अंगणात कशाकशाची रास पडते?

२) कवीच्या अंगणात पाखरे का येतात?

३) कवी गुण्यागोविंदाने रानमेवा खायला का सांगत आहेत?

४) गवत खुशीने का डुलते?

Sample Paper Prabhat Kids School, Akola

५) मुलांच्या गाण्यातून काय काय फुलते?

६) कवितेत खुळे कोणाला म्हटले आहे?

**प्रश्न ६ आ) योग्य पर्याय ओळखून रिकाम्या जागा भरा. (कोणतेही ४) गुण ४**

१) गहू, शाळवाचं मोती....... रानात सांडलं
(पांढर्या, काळ्या, निळ्या, हिरव्या)

२) दूर उडूनिया जाता...... येती गालावर (आसू, पाणी, मिजास, साय)

३) जीव दमतो, शिणतो घास भरवते...... (बाप,काका, माय, मावशी)

४) गाणे अमुचे झुळझुळ वारा, गाणे आमचे लुकलुक.... (तारा, चांदणे, चंद्र, तारे)

५) कुरणावरती झाडाखाली उन सावली विणते......... (साडी, जाळी, काळी, जळाली)

**प्रश्न ६ इ) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही २) गुण ४**

१) कवितेतील मुलांचे गाणे कधी जुळून येते?

२) तुम्ही पाहिलेल्या एखाद्या धान्याच्या शेताचे वर्णन थोडक्यात लिहा?

३) रानमेवा कुठे उगवला आहे?

## विभाग ड रचनात्मक लेखन

**प्रश्न ७ खालील मुद्द्यांच्या आधारे निबंध लेखन करा. (कोणतेही १) गुण ६**

१) मी पाहिलेले निसर्गरम्य ठिकाण

ठिकाणाचे नाव.....पोहचण्याचे माध्यम.....निसर्ग रम्य वातावरण ..... खाद्य संस्कृती ..... मिळालेला आनंद ..... व्यक्तीमत्व विकासात शाळेची भूमिका...... शाळेबद्दल तुमची भावना.

२) मी मुख्यमंत्री झालो तर....

काय काय करणार .... समस्या व उपाय........ शिक्षणात बदल...... आरोग्य सेवेत बदल.... रोजगार निर्मीती...... नोकरीची सोय ....... शासकीय कामाची गती.

**प्रश्न ८ : खालील दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथा लेखन करा. (कोणतेही १) गुण ६**

१) एक सुतार जंगलात जाणे....... एकदा खड्ड्यात पडलेल्या जंगली कुत्र्याच्या पिल्लाचा जीव वाचवणे....... लळा लागणे....... इतर कुत्रे येऊन बसत........ त्या कुत्र्यांना वाघाची भीती......... वाघ हल्ला करणे........... सुताराने योजना सांगणे...... वाघ येणे...... एका कुत्र्यावर हल्ला करणे उडी मारणे......... वाघ खड्ड्यात पडणे........... सर्व कुत्रे त्यावर एकत्र हल्ला करणे..... वाघ ठार........... शीर्षक व तात्पर्य

२) एक कोल्हा...... भूक लागणे....... शिकार न मिळणे..... द्राक्षांची बाग दिसणे...... खाण्याची ईच्छा होणे........ द्राक्ष उंचावर असणे....... तोंडाला पाणी सुटणे.......... बरेच प्रयत्न करणे...... तोंड न पुरणे....... शेवटी निराश होणे..... द्राक्ष आंबट आहेत..... मला नकोच म्हणून निघून जाणे..... तात्पर्य

**प्रश्न ९ : पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लेखन करा. गुण ५**

Sample Paper Prabhat Kids School, Akola

१) प्रणय साखरे / प्रणाली साखरे, प्रभात किड्स स्कूलचा / ची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शाळेत वृक्षारोपणासाठी व्यवस्थापक, निशू नर्सरी, गांधी रोड अकोला यांना वृक्षांची मागणी करणारे पत्र लिहीत आहे.

२) केतन सरप / केतकी सरप प्रभात किड्स स्कूलचा / ची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने व्यवस्थापक, विठ्ठल बुक डेपो, तिलक रोड, अकोला यांना ग्रंथालयाकरिता पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहीत आहे.

Sample Paper
Prabhat Kids School,
Akola